# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar
## Date – 04 January 2026
## Time 7.10 AM to 7.20 AM
## Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक ०४ जानेवारी २०२६ सकाळी ७.१० मि.**

****

- महानगरपालिका निवडणुकीची अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध, एकूण १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात
- सदानंद दाते यांनी स्वीकारला राज्याच्या पोलीस महासंचालकपदाचा कार्यभार, रश्मी शुक्ला सेवानिवृत्त
- छत्तीसगडमध्ये काल दोन वेगवेगळ्या चकमकीत १४ नक्षलवादी ठार, तर तेलंगणात २० नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण
- सावित्रीबाई फुले यांच्या स्मारकाचं आणि महिला प्रशिक्षण केंद्राचं सातार्‍यात भूमिपूजन

आणि

- ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा आज समारोप

****

राज्यातल्या महानगरपालिका निवडणुकंसाठी १५ हजार ९३१ उमेदवार रिंगणात आहेत, अशी माहिती राज्य निवडणूक आयोगानं काल दिली. २९ महापालिकांमधल्या दोन हजार ८६९ प्रभागांमधून हे उमेदवार रिंगणात आहेत. या निवडणुकीसाठी एकंदर ३३ हजार ४२७ अर्ज आले होते, त्यातले २४ हजार ७७१ अर्ज वैध ठरले होते. त्यापैकी आठ हजार ८४० उमेदवारांनी अर्ज मागे घेतल्याची माहिती निवडणूक आयोगानं दिली. काल चिन्ह वाटप करुन अंतिम उमेदवार यादी प्रसिद्ध झाली.

छत्रपती संभाजीनगर महापालिकेतल्या २९ प्रभागांच्या ११५ सदस्य संख्येसाठी एकूण ८५९ उमेदवार निवडणूक रिंगणात आहेत.
लातूरच्या १८ प्रभागांच्या ७० सदस्यांसाठी ३५९ उमेदवार, परभणीत १६ प्रभागांसाठीच्या ६५ सदस्यांसाठी ४११ उमेदवार, नांदेड-वाघाळा महापालिकेत २० प्रभागांच्या ८१ सदस्यसंख्येसाठी ४९१ उमेदवार, तर जालन्यात १६ प्रभागांसाठीच्या ६५ सदस्यांसाठी ४५३ उमेदवार निवडणूक लढवत आहेत.
येत्या १५ जानेवारी रोजी मतदान, तर १६ जानेवारीला मतमोजणी होणार आहे.

****

छत्रपती संभाजीनगर महापालिका निवडणुकीसाठी–इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्र पुरेशा प्रमाणात उपलब्ध असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. जिल्ह्यातल्या विविध तहसील कार्यालयांकडून ते हस्तगत करण्यात आले आहेत.

****

दरम्यान, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत वरळी इथं महापालिका निवडणुकीच्या प्रचाराला सुरुवात केली. फक्त पायाभूत सुविधांची कामं नाही तर गोरगरीब, मध्यमवर्गीय माणसाच्या जीवनात बदल घडवायचा असल्याचं ते यावेळी म्हणाले.

****

महाराष्ट्राच्या पहिल्या महिला पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला काल सेवानिवृत्त झाल्या. पोलीस दलात साडे ३७ वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करणाऱ्या शुक्ला यांना मुंबईत भोईवाडा इथल्या पोलीस मैदानात मानवंदना देण्यात आली. राज्याचे नवनियुक्त पोलीस महासंचालक सदानंद दाते यांनी काल रश्मी शुक्ला यांच्याकडून आपल्या पदाचा कार्यभार स्वीकारला.  दहशतवाद विरोधी पथक, एनआयए, सीबीआय, सीआरपीएफ अशा महत्त्वाच्या संस्थांमधल्या कामाचा प्रदीर्घ अनुभव असलेले सदानंद दाते भारतीय पोलीस सेवेच्या १९९० च्या तुकडीतले अधिकारी आहेत.

****

दोन लाख रुपयांपर्यंतच्या पीक कर्जासाठी मुद्रांक शुल्क माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारनं घेतला आहे. एक जानेवारीपासून याची अंमलबजावणी सुरू झाली आहे. सर्व बँका, सहकारी संस्था आणि कर्जवाटप करणाऱ्या यंत्रणांना हा निर्णय

बंधनकारक राहणार आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांची ६०० रुपये बचत होणार आहे.

****

तथागत भगवान गौतम बुद्धांचे पिपरहवा अवशेष हे भारताच्या समृद्ध वारशाचा अभिन्न घटक असल्याचं प्रतिपादन, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. नवी दिल्ली इथं या अवशेषांच्या भव्य आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी ते काल बोलत होते. नववर्षाच्या सुरुवातील असा प्रेरणादायी कार्यक्रम होणं, ही चांगली सुरुवात असल्याचं त्यांनी नमूद केलं. बुद्धांचे हे अवशेष परदेशात जाण्याच्या अनुषंगाने बोलतांना पंतप्रधान म्हणाले...

**बाईट–पीएम बुद्ध**

****

कृषीक्षेत्रासाठी केंद्र सरकारकडून मिळणारा निधी खर्च करण्यात होत असलेल्या दिरंगाईबाबत केंद्रीय कृषी मंत्री शिवराजसिंग चौहान यांनी चिंता व्यक्त केली. नवी दिल्ली इथं राज्यांच्या कृषीमंत्र्यांच्या बैठकीत ते काल बोलत होते. या विलंबामुळे राज्यांना पुढचा निधी मिळायला उशीर होतो, त्यामुळे खर्चासाठी सुनियोजित धोरण आखावं, असं आवाहन त्यांनी केलं. पात्र लाभार्थ्यांच्या कागदपत्रांची पडताळणी तत्परतेनं करावी, पीकविमा योजनेचा विस्तार करावा, तसंच बियाणं आणि खतांच्या उपलब्धतेबाबत केंद्राबरोबर सतत संपर्कात रहावं अशा सूचना चौहान यांनी केल्या.

****

छत्तीसगड मध्ये काल दोन वेगवेगळ्या ठिकाणी सुरक्षा दलांशी झालेल्या चकमकीत एकूण १४ नक्षलवादी मारले गेले. बिजापूर मध्ये बासुगुडा भागात नक्षलवादी असल्याची माहिती मिळताच पोलिसांचं पथक तिथं तातडीनं रवाना झालं. त्यानंतर गगनपल्ली गावाजवळ दोन्ही बाजूंनी झालेल्या गोळीबारात दोन नक्षलवादी मारले गेले. सुकमा जिल्ह्यातही पोलिसांच्या कारवाईत १२ जण मारले गेले. सुरक्षा दलांनी चकमकीच्या ठिकाणाहून सर्व मृतदेह ताब्यात घेतले असून, घटनास्थळावरून मोठ्या प्रमाणावर शस्त्रास्त्रंही जप्त करण्यात आली आहेत.

****

हैद्राबाद इथं वीस नक्षलवाद्यांनी काल तेलंगणाचे पोलीस महासंचालक शिवधर रेड्डी यांच्यासमोर आपल्या शस्त्रसाठ्यासह आत्मसमर्पण केलं. यात पीपल्स लिबरेशन गुरिल्ला आर्मीचा बटालियन कमांडर देवा ऊर्फ बदसे सुक्का आणि तेलंगणा समिती

सदस्य कंकनला राजी रेड्डी यांचा समावेश आहे. पोलिसांनी त्यांना एक कोटी ८१ लाख ९० हजार रुपयांचे बक्षीस जाहीर केलं असून, तातडीची मदत म्हणून प्रत्येकी २५ हजार रुपये निधी दिला आहे.

****

स्त्रीशिक्षणाच्या प्रणेत्या क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त काल देशभरातून त्यांना अभिवादन करण्यात आलं.

सातारा जिल्ह्यातल्या नायगाव या सावित्रीबाईंच्या जन्मगावी त्यांच्या स्मारकाचं आणि महिला प्रशिक्षण केंद्राचं भूमिपूजन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते काल झालं. ज्या व्यक्तिमत्त्वांकडे पाहून आपल्याला प्रेरणा मिळते, अशा थोर व्यक्तींमध्ये सावित्रीबाई फुले यांचं नाव अतिशय महत्त्वाचं आहे, असे गौरवोद्गार त्यांनी काढले.

**बाईट– मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

या स्मारक परिसरात महिलांना सक्षम करण्यासाठी प्रशिक्षण केंद्रही उभारलं जाईल, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. नायगावचं नाव बदलून सावित्राबाई फुले यांच्या नावावरून ठेवायचा निर्णय जर इथल्या ग्रामसभेनं घेतला, तर विनाविलंब त्याला मान्यता देऊ, असं आश्वासनही त्यांनी दिलं.

**

सावित्रीबाईंच्या जयंतीनिमित्त बीड शहरात अभिवादन रॅली काढण्यात आली. नांदेड इथंही जिल्हाधिकारी कार्यालयात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आलं. परभणीत पूर्णा तालुक्यात विद्यार्थ्यांनी सावित्रीबाई फुले आणि जिजामाता यांच्या वेशभूषा साकारून त्यांचा जीवनपट सादर केला.

**

छत्रपती संभाजीनगर इथं औरंगपुरा परिसरात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिबा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून विविध संघटनेच्या वतीने अभिवादन करण्यात आलं. दरम्यान विविध ठिकाणी प्रभातफेरी, घोषवाक्ये आणि प्रेरणादायी संदेशांद्वारे सामाजिक प्रबोधन करण्यात आलं. काही स्वयंसेवी संस्थांच्या वतीने व्याख्याने, निबंध, वक्तृत्व स्पर्धा तसंच सांस्कृतिक कार्यक्रम घेण्यात आले.

**

छत्रपती संभाजीनगर इथं सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळातर्फे डॉ. रखमाबाई राऊत सेवा पुरस्कार तसंच डॉ. भीमराव गस्ती प्रबोधन पुरस्काराचं आज वितरण होणार आहे. यंदा, नशिक जिल्ह्यातल्या हिवाळी इथले शिक्षक केशव गावित यांना डॉ. रखमाबाई राऊत सेवा पुरस्कार आणि नांदेड जिल्ह्यातले फरीदा बक्श उर्फ गुरुमाय यांना डॉ. भीमराव गस्ती प्रबोधन पुरस्काराने सन्मानित करण्यात येत आहे.

****

सातारा इथं आयोजित ९९व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचा आज समारोप होत आहे. दुपारी साडेचार वाजता ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त रघुवीर चौधरी, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मराठी भाषा मंत्री उदय सामंत, पालकमंत्री शंभुराज देसाई यांच्या उपस्थितीत हा समारोप सोहळा होईल.

तत्पुर्वी आज दिवसभरात संमेलनात, पुस्तक  चर्चा, मुलाखत, कविसंमेलन, परिसंवाद, कादंबरीकारांसोबत संवाद आणि रात्री सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहे.

****

श्री क्षेत्र तुळजापूर इथं श्री तुळजाभवानी देवींच्या शाकंभरी नवरात्रोत्सवाची काल घटोत्थापनेनं सांगता झाली. यावेळी मंदिरातील होमामध्ये कोहळा आणि नारळ यांची पूर्णाहुती देण्यात आली. २८ डिसेंबरपासून सुरूवात झालेल्या या महोत्सवात देवीची विशेष पूजा तसंच विविध धार्मिक विधी पार पडले.

****

राज्यात काल सर्वात कमी नऊ पूर्णांक एक दशांश सेल्सियस तापमान जळगाव इथं नोंदवलं गेलं. त्याखालोखाल अहिल्यानगर इथं १२ पूर्णांक तीन तर धाराशिव इथं सुमारे साडे बारा अंश सेल्सियस तापमानाची नोंद झाली. बीड इथं साडे अकरा, छत्रपती संभाजीनगर इथं १३ पूर्णांक आठ, परभणी इथं १४, तर नांदेड इथं सुमारे १५ अंश सेल्सियस तापमान नोंदवलं गेलं.

****